"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मेळावा / समक्ष मुलाखती

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा कौशल्य, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने **"मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना"** राबवली जाणार आहे, सदर योजना इच्छुक युवकांना कार्य प्रशिक्षणाची (Apprentice) संधी मोठया प्रमाणात प्रदान करण्यासाठी सुरु केलेली आहे. या योजनेचें उद्दिष्ट उमेदवारांना उद्योजकाकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करुन उद्योजकांना आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आहे.

सदर योजनेकरिता उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे असेल.

१. उमेदवाराचे वय किमान १८ व कमाल ३५ वर्षे असावे.
२. उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास/आयटीआय/पदविका/पदवी/पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत.
३. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
४. उमेदवाराची आधार नोंदणी असावी.
५. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
६. उमेदवाराने https://www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. तसेच पोर्टलवरील पदांसाठी Online Apply करणे आवश्यक आहे. संकेतस्थळावर नोंदणी नसलेले उमेदवार सुध्दा मुलाखतीस येऊ शकतात.
७. सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल, तदनंतर आपली प्रशिक्षणार्थी म्हणून झालेली निवड आपोआप संपुष्टात येईल.
८. एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.
९. उमेदवाराने मुलाखतीसाठी स्व:खर्चाने उपस्थित रहावे.
१०. मुलाखतीसाठी प्रशिक्षणार्थी उमेदवारांनी मुळ शैक्षणिक कागदपत्रे,आधारकार्ड तसेच या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती सोबत घेऊन यावे. अधिक माहितीसाठी आस्थापना विभागाच्या ०२३१-२६०९०९८ / ९२५८ या दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**प्रशिक्षणार्थी विवरण व त्यांची संख्या**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थी पद | शैक्षणिक अर्हता | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थी कनिष्ठ लेखनिक | पदवीधर व संगणकाचे ज्ञान आवश्यक, शासनमान्य इंग्रजी व मराठी टंकलेखनाचे ज्ञान आवश्यक | ३० |
| २ | प्रशिक्षणार्थी लघुलेखक | पदवीधर, इंग्रजी लघुलेखन १०० व मराठी लघुलेखन १००, मराठी ३० व इंग्रजी ४० टंकलेखन शा.प्र.मि. शासकीय परीक्षा उत्तीर्ण. | ०४ |
| ३ | प्रशिक्षणार्थी सुतार | शासनमान्य आय.टी.आय.कोर्स उत्तीर्ण किंवा सुतार कामाचा १ वर्ष अनुभव | ०१ |
| ४ | प्रशिक्षणार्थी पंप ऑपरेटर | शासनमान्य पंप ऑपरेटर आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण | ०२ |
| ५ | प्रशिक्षणार्थी सहाय्यक प्लंबर | शासनमान्य प्लंबर आय.टी.आय.कोर्स उत्तीर्ण | ०२ |
| ६ | प्रशिक्षणार्थी गवंडी | शासनमान्य गवंडी आय.टी.आय.कोर्स उत्तीर्ण | ०१ |
| ७ | प्रशिक्षणार्थी वायरमन | शासनमान्य वायरमन (तारतंत्री) आय.टी.आय.कोर्स उत्तीर्ण | ०४ |
| ८ | प्रशिक्षणार्थी प्रयोगशाळा सहाय्यक | Any Diploma from M.S.B.T.E OR B.Sc. संगणक ज्ञान आवश्यक | ०३ |
| ९ | मेस्त्री | शासनमान्य आय.टी.आय.सिव्हील मेस्त्री प्रमाणधारक / बिल्डींग कन्स्ट्रक्शन कोर्स उत्तीर्ण | ०१ |

या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२४/ प्र.क्र.९०/ व्यशि-३, दि. ०९/०७/२०२४ प्रमाणे विद्यावेतन महाराष्ट्र शासनामार्फत DBT प्रणालीद्वारे दिले जाईल. या योजनेची प्रक्रिया विद्यापीठाद्वारे राबविली जाणार आहे. मात्र विद्यावेतन अदा करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाची आहे. **(अधिक माहितीसाठी शासन निर्णय सोबत जोडला आहे तो वाचावा.)** सदर विद्यावेतनाचे विवरण खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन |
|---|---|---|
| १ | १२ वी पास | रु. ६,०००/- |
| २ | आय.टी.आय/पदविका | रु. ८,०००/- |
| ३ | पदवीधर/ पदव्युत्तर | रु. १०,०००/- |

तसेच सदरचे प्रशिक्षण योजना ही उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार विद्यापीठ कार्यालय मार्फत राबविणेत येणार असलेने निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना विद्यापीठामार्फत कोणत्याही प्रकारचे वेतन/मानधन देय असणार नाही. याच बरोबर या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेत असताना कोणतेही किमान वेतन कायदा, राज्यकामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू रहाणार नाही. तसेच या योजनेंतर्गत विद्यापीठ कार्यालयात तात्पुरत्या कालावधीकरीता देण्यात आलेल्या नियुक्तीमूळे आपणास विद्यापीठाच्या कायम सेवेमध्ये समावेश करून घेण्याबाबत कोणताही अधिकार/हक्क प्राप्त होणार नाहीत.

**समक्ष मुलाखत/मेळावा शनिवार दि. २१/०९/२०२४. वेळ :- सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा.**

**समक्ष मुलाखत/मेळावा ठिकाण - रामानुजन हॉल, गणित अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**जा.क्र.आस्थापना/जाहिरात ०८/२०२४**

**दिनांक : १२/०९/२०२४**

डॉ.व्ही.एन.शिंदे
कुलसचिव